# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मनपा शिक्षण विभाग (माध्यमिक) अंतर्गत कार्यरत कंत्राटी शिक्षकांच्या,
**{शिक्षण विभाग}** मासिक मानधनात वाढ करण्याबाबत तसेच रजा मान्य करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत 29 माध्यमिक शाळा तसेच उर्दू माध्यम - 03 (कला / विज्ञान / वाणिज्य) इंग्रजी माध्यम (विज्ञान शाखा) - 01 अशी 4 कनिष्ठ महाविद्यालये संचालीत करण्यात येतात. यापैकी 17 माध्य. शाळा व 1 कनिष्ठ महाविद्यालय अनुदान प्राप्त असून उर्वरीत 12 माध्य. शाळा व 3 कनिष्ठ महाविद्यालये विना अनुदानित तत्वांवर चालविण्यात येतात. माध्यमिक शाळांमध्ये गणित, विज्ञान, व इंग्रजी या विषयांच्या शिक्षकांची कमतरता असल्यामुळे तसेच प्राथमिक आस्थापनेवर देखील या विषयांना शिकविणा-या शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे, सर्वप्रथम शैक्षणिक सत्र 2009 व 2010 ला ला घडयाळी तासिका तत्वांवर शैक्षणिक सत्र 2009-10/2010-11 ते शैक्षणिक सत्र 2017-18 पर्यंत सरासरी 54 शिक्षकांनी नियमितपणे घडयाळी तासिका तत्वांवर सरासरी मासिक मानधन रू. 4000-6000 वर कार्य केले. माध्यमिक शाळांवर विशेषत: हिंदी व उर्दू माध्यमात विज्ञान/गणित/इंग्रजी विषयांना शिकविण्याकरीता शैक्षणिक पात्रता धारक (BSC.B.Ed/B.A.B.Ed. (Eng.Lit) शिक्षक कमी संख्येने उपलब्ध असल्यामुळे विशेषत: गणित/विज्ञान/ इंग्रजी विषय शिकविण्याकरीता शैक्षणिक सत्र 2017-18 मध्ये विषय शिक्षकांची भरती प्रक्रीया राबवून कंत्राटी पध्दतीवर एकत्रित मानधन तत्वावर माध्यमिक शाळेकरीता - 14,000/- प्रमाणे 38 व कनिष्ठ महाविद्यालयाकरीता - रु.15,000/- प्रमाणे 18 शिक्षकांची पदभरती करण्यात आली.

या सर्व कंत्राटी शिक्षकांना शैक्षणिक सत्र 2017-18 पासून नियमितपणे आवश्यकतेनुसार तांत्रिक खंड देऊन नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक सत्र २०२२-२३ करिता देखील मा. प्रशासक यांच्या मान्यतेने पुढील ११ महिन्यांकरिता नियुक्ती देण्यात आलेली आहे मनपा शाळांवर कार्यरत नियमीत शिक्षका एवढयाच तासिका व कार्यभार कंत्राटी तत्वावरील शिक्षक यांच्या कडे आहेत. काही शिक्षकवर्ग शिक्षक म्हणून देखील कार्यरत आहेत. कंत्राटी तत्वावर नेमलेले बहुतांश शिक्षक हे गणित, विज्ञान, इंग्रजी या मुख्य विषयांचे शिक्षक असून हे सर्व शिक्षक माध्यमिक शाळांवर इयत्ता ८ ते १० व कनिष्ठ महाविद्यालय इयत्ता ११ वी/१२ वी वर अध्यापन करतात. मागील ३ ते ४ वर्षा पासून पेट्रोल व इतरही सर्व बाबतीत महागाई दुप्पट ते तीप्पट दराने वाढलेली असून सध्यास्थितीत प्राप्त मासिक मानधन अपूरे आहे नागपूर महानगरपालिके प्रमाणेच इतरही महानगरपालिका जसे नवी मुंबई, पुणे येथे प्राथमिक /माध्यमिक शाळांवर कंत्राटी शिक्षक कार्यरत असून यापैकी नवी मुंबई महानगरपालिकेत या शिक्षकांना मासिक २५००० मानधन देण्यात येते. या शिक्षकांनी मागील ११ ते १२ वर्षात रू. ४०००/५००० (७ वर्ष) ते रू. १४०००/१५००० (४ वर्ष) इतक्या मानधनावर कार्य केलेले आहे. वाढती महागाई लक्षात घेता कंत्राटी शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासून ते यापुढे दरवर्षी करीता (कंत्राटी शिक्षक कार्यरत असेपर्यंत) मानधन रू. २५०००/- प्रति माह करण्यास तसेच या कंत्राटी शिक्षकांना शैक्षणिक सत्रनिहाय वार्षिक १२ किरकोळ रजा व १० असाधारण रजा/वैद्यकीय रजा अनुज्ञेय करण्याच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली असून प्रस्तूत निर्णय आर्थिक तसेच धोरणात्मक स्वरूपाचा असल्यामुळे यास मा. प्रशासक यांची मान्यता आवश्यक आहे.

सबब महानगरपालिका माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांवर कार्यरत कंत्राटी शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये त्यांचे नियुक्ती दिनांक २७.०६.२०२२ पासून यापुढे दरवर्षी करीता मासिक मानधन २५०००/- प्रति माह करण्यास तसेच या कंत्राटी शिक्षकांना प्रत्येक शैक्षणिक सत्रनिहाय एकूण वार्षिक १२ किरकोळ रजा व वैद्यकीय कारणास्तव १० रजा अनुज्ञेय करण्याचा ठराव मान्यतेस्तव सादर.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 70/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 17/08/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा शिक्षण विभाग (माध्यमिक) अंतर्गत कार्यरत कंत्राटी शिक्षकांच्या, मासिक मानधनात वाढ करण्याबाबत तसेच रजा मान्य करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत 29 माध्यमिक शाळा तसेच उर्दू माध्यम - 03 (कला / विज्ञान / वाणिज्य) इंग्रजी माध्यम (विज्ञान शाखा) - 01 अशी 4 कनिष्ठ महाविद्यालये संचालीत करण्यात येतात. यापैकी 17 माध्य. शाळा व 1 कनिष्ठ महाविद्यालय अनुदान प्राप्त असून उर्वरीत 12 माध्य. शाळा व 3 कनिष्ठ महाविद्यालये विना अनुदानित तत्वांवर चालविण्यात येतात. माध्यमिक शाळांमध्ये गणित, विज्ञान, व इंग्रजी या विषयांच्या शिक्षकांची कमतरता असल्यामुळे तसेच प्राथमिक आस्थापनेवर देखील या विषयांना शिकविणा-या शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे, सर्वप्रथम शैक्षणिक सत्र 2009 व 2010 ला ला घडयाळी तासिका तत्वांवर शैक्षणिक सत्र 2009-10/2010-11 ते शैक्षणिक सत्र 2017-18 पर्यंत सरासरी 54 शिक्षकांनी नियमितपणे घडयाळी तासिका तत्वांवर सरासरी मासिक मानधन रू. 4000-6000 वर कार्य केले. माध्यमिक शाळांवर विशेषत: हिंदी व उर्दू माध्यमात विज्ञान/गणित/इंग्रजी विषयांना शिकविण्याकरीता शैक्षणिक पात्रता धारक (BSC.B.Ed/B.A.B.Ed. (Eng.Lit) शिक्षक कमी संख्येने उपलब्ध असल्यामुळे विशेषत: गणित/विज्ञान/ इंग्रजी विषय शिकविण्याकरीता शैक्षणिक सत्र 2017-18 मध्ये विषय शिक्षकांची भरती प्रक्रीया राबवून कंत्राटी पध्दतीवर एकत्रित मानधन तत्वावर माध्यमिक शाळेकरीता - 14,000/- प्रमाणे 38 व कनिष्ठ महाविद्यालयाकरीता - रु.15,000/- प्रमाणे 18 शिक्षकांची पदभरती करण्यात आली.

या सर्व कंत्राटी शिक्षकांना शैक्षणिक सत्र 2017-18 पासून नियमितपणे आवश्यकतेनुसार तांत्रिक खंड देऊन नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक सत्र २०२२-२३ करिता देखील मा. प्रशासक यांच्या मान्यतेने पुढील ११ महिन्यांकरिता नियुक्ती देण्यात आलेली आहे मनपा शाळांवर कार्यरत नियमीत शिक्षका एवढयाच तासिका व कार्यभार कंत्राटी तत्वावरील शिक्षक यांच्या कडे आहेत. काही शिक्षकवर्ग शिक्षक म्हणून देखील कार्यरत आहेत. कंत्राटी तत्वावर नेमलेले बहुतांश शिक्षक हे गणित, विज्ञान, इंग्रजी या मुख्य विषयांचे शिक्षक असून हे सर्व शिक्षक माध्यमिक शाळांवर इयत्ता ८ ते १० व कनिष्ठ महाविद्यालय इयत्ता ११ वी/१२ वी वर अध्यापन करतात. मागील ३ ते ४ वर्षा पासून पेट्रोल व इतरही सर्व बाबतीत महागाई दुप्पट ते तीप्पट दराने वाढलेली असून सध्यास्थितीत प्राप्त मासिक मानधन अपूरे आहे नागपूर महानगरपालिके प्रमाणेच इतरही महानगरपालिका जसे नवी मुंबई, पुणे येथे प्राथमिक /माध्यमिक शाळांवर कंत्राटी शिक्षक कार्यरत असून यापैकी नवी मुबंई महानगरपालिकेत या शिक्षकांना मासिक २५००० मानधन देण्यात येते. या शिक्षकांनी मागील ११ ते १२ वर्षात रू. ४०००/५००० (७ वर्ष) ते रू. १४०००/१५००० (४ वर्ष) इतक्या मानधनावर कार्य केलेले आहे. वाढती महागाई लक्षात घेता कंत्राटी शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासून ते यापुढे दरवर्षी करीता (कंत्राटी शिक्षक कार्यरत असेपर्यंत) मानधन रू. २५०००/- प्रति माह करण्यास तसेच या कंत्राटी शिक्षकांना शैक्षणिक सत्रनिहाय वार्षिक १२ किरकोळ रजा व १० असाधारण रजा/वैद्यकीय रजा अनुज्ञेय करण्याच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली असून प्रस्तूत निर्णय आर्थिक तसेच धोरणात्मक स्वरूपाचा असल्यामुळे यास मा. प्रशासक यांची मान्यता आवश्यक आहे.

सबब महानगरपालिका माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांवर कार्यरत कंत्राटी शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये त्यांचे नियुक्ती दिनांक २७.०६.२०२२ पासून यापुढे दरवर्षी करीता मासिक मानधन २५०००/- प्रति माह करण्यास तसेच या कंत्राटी शिक्षकांना प्रत्येक शैक्षणिक सत्रनिहाय एकूण वार्षिक १२ किरकोळ रजा व वैद्यकीय कारणास्तव १० रजा अनुज्ञेय करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**